दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष ६ वे || अंक ६८ || शुक्रवार ०६ मार्च २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्या तुळसा जाधव यांचा राज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत शिवसेनेत पक्ष प्रवेश

मुंबई, दि. ४ मार्च, २०२६: नुकत्याच पार पडलेल्या दापोली पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत हर्णे पंचायत समिती गणातून अनुसूचित जमाती प्रवर्गातील स्त्री राखीव जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या सदस्या सौ. तुळसा भरत जाधव यांनी राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश मंत्री कदम यांच्या मुंबईतील सुनिती निवासस्थानी पार पडला.



यावेळी शिवसेनेचे हर्णे गणाचे समन्वयक सोमनाथ पावसे, बंदर कमिटीचे अध्यक्ष बाळकृष्ण पावसे, हर्णे जिल्हा परिषद गटाचे पालक भगवान घाडगे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.ङ्गयावेळी बोलताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी दापोली तालुक्यातील विकासकामांना गती देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे असल्याचे सांगितले. सौ. तुळसा जाधव यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेचे संघटन दापोली तालुक्यात अधिक बळकट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## गिम्हवणे येथे डंपर आणि दुचाकी मध्ये अपघात.. दुचाकीस्वार गंभीर जखमी

दापोली प्रतिनिधी:- दिनांक ५मार्च गुरुवार रोजी दुपारी दोनच्या सुमारास दापोली तालुक्यातील दापोली ते हर्णे रस्त्यावर गिम्हवणे येथील पटवर्धन हॉस्पिटल व पंजाब नॅशनल बँक या परिसरात दुचाकी आणि डंपर यांच्यात अपघात झाला.ङ्ग या अपघाता मध्ये सुशांत दशरथ झिमण वय वर्ष सुमारे २५ राहणार महाळुंगे तालुका दापोली हे दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले आहेत.ङ्ग दापोलीकडून हर्णे कडे जाणारा डंपर व हर्णे रोड कडून दापोलीकडे येणारी दुचाकी या दोघात धडक होऊन




दुचाकीस्वार गंभीरित्या जखमी होऊन प्रथम उपचाराकरिता दापोली उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून पुढील उपचाराकरिता डेरवण येथे हलवण्यात आल्याचे सूत्राकडून समजले आहे.

## पनवेल येथे मकबुल दुवाँ पुस्तक प्रकाशन कार्यक्रम सपंन्न

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुबंई,पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल काझी यांचे हस्ते मकबुल दुवाँ या पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी हलीमाबाई झुलेवाली ट्रस्टचे अध्यक्ष हनीफ कच्ची यांच्यासह झुबेर पिट्टु ,जव्वाद काझी,माझ मुल्ला,आसिफ कारेल, निसार पटेल, अझीम मुल्ला,नुर पटेल यासर आणी साजिद पटेल यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी इकबाल काझी यांनी आपल्या भाषणात हनीफ कच्ची यांच्या




सामाजिक व राष्ट्रहिताच्या कार्याचे कौतुक केले.ते देश आणी समाजाच्या प्रगती साठी तसेच तरुण पिडीला चांगले, सद्घगुणी नागरिक बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सागिंतले.पुस्तके व दुवाँ यांच्या माध्यमातुन समाजाला योग्य मार्गावर नेण्याचा हा एक महत्वाचा उपक्रम असल्याचे त्यांनी नमुद केले. हा कार्यक्रम अतिशय आनंदमय वातावरणात सपंन्न झाला.

## दापोली-खेड महामार्गावर कारचा भीषण अपघात; रस्त्यालगतच्या सिमेंट मोरीला जोरदार धडक

दापोली प्रतिनिधी ०५मार्च: दापोली-खेड महामार्गावर नवानगर परिसरात सकाळी ८:३० ते ९:०० च्या सुमारास आज दिनांक ५ मार्च रोजी सकाळी एका चारचाकी वाहनाचा भीषण अपघात झाला.सुदैवाने चालक या अपघातातून थोडक्यात बचावला आहे.ङ्ग मिळालेल्या माहितीनुसार, मारुती सुझुकी स्विफ्ट कार (क्र. ०८ ०५२५) दापोलीकडून खेडच्या दिशेने जात होती. नवानगर परिसरात जवळ रस्त्याचे काम सुरू असल्याने सिमेंटच्या मोरीचे तीन सिमेंट पाईप रस्त्यालगत ठेवण्यात आले आहेत. कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही कार थेट त्या सिमेंटच्या रस्त्या लगतच ठेवलेल्या मोरीच्या



पायपाना जाऊन धडकली. या धडकेत कारच्या पुढच्या भागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कारचा पुढचा डावा हिस्सा पूर्णपणे चक्काचूर झाला असून . या अपघातात चालकाला किरकोळ दुखापत झाली असून, त्यांना तत्काळ उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रस्त्यालगत असलेल्या बांधकामाच्या साहित्यामुळे हा अपघात घडल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. अपघातानंतर परिसरात काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. रस्त्याची कामे सुरू असताना सुरक्षिततेचे नियम पाळणे आणि वाहने सावकाश चालवणे गरजेचे असल्याचे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## रामभाऊ म्हाळगी हे अभ्यासू आणि तत्त्वनिष्ठ राजकारणी होते! डॉ. भारत कऱ्हाड

दापोली, दि. ६ मार्च : भारतीय राजकारणातील अभ्यासू, तत्त्वनिष्ठ आणि संघटनक्षम नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे रामचंद्र काशिनाथ म्हाळगी उर्फ रामभाऊ म्हाळगी यांची आज पुण्यतिथी आहे. या निमित्ताने विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी त्यांना आदरांजली अर्पण करत आहेत.ङ्गरामचंद्र काशीनाथ म्हाळगी यांचा जन्म ९ जुलै १९२१ रोजी झाला. त्यांनी कला शाखेत पदव्युत्तर पदवी (एम.ए.) आणि कायदा पदवी (एल.एल.बी.) प्राप्त केली. बार कौन्सिलची परीक्षा उत्तीर्ण करून त्यांनी वकिली करण्याचा अधिकारही मिळवला. शिक्षण, अभ्यास आणि



वैचारिक बांधिलकी यामुळे त्यांची ओळख अभ्यासू नेते म्हणून निर्माण झाली.ङ्गरामभाऊ म्हाळगी यांचा सामाजिक आणि वैचारिक प्रवास आरएसएस या संघटनेतून सुरू झाला. १९५० ते १९५४ या कालावधीत त्यांनी प्रांतीय सचिव म्हणून काम करत संघटन उभारणी, विचारप्रसार आणि कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले.ङ्गयानंतर त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश करून भारतीय जनता पक्ष या पक्षाशी आपले कार्य जोडले. लोकसभा सदस्य म्हणून काम करताना त्यांनी जनतेचे प्रश्न प्रभावीपणे संसदेत मांडले. अभ्यास, शिस्त आणि संघटन कौशल्य यांच्या बळावर त्यांनी राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली.ङ्ग६ मार्च १९८२ रोजी वयाच्या ६० व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही संस्था स्थापन करण्यात आली असून ती आजही सार्वजनिक धोरण, नेतृत्व प्रशिक्षण आणि सामाजिक कार्यासाठी कार्यरत आहे.ङ्गयावेळी डॉ. भारत कऱ्हाड यांनी सांगितले की, ''रामभाऊ म्हाळगी हे अभ्यासू आणि तत्त्वनिष्ठ राजकारणी होते. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, विचारांची स्पष्टता आणि संघटन कौशल्य यांचे उत्कृष्ट उदाहरण त्यांच्या कार्यातून दिसून येते.''ङ्गरामभाऊ म्हाळगी यांचे कार्य आणि विचार आजही अनेकांना प्रेरणा देणारे आहेत.

## छ. शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंतीची जय्यत तयारी; विविध गुणदर्शन कार्यक्रमांनी होणार साजरी!

सहसंपादक-: नारायण म्हात्रे

अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छ. शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती अतिशय उत्साहात व आनंदीमय वातावरणात चोळे (टेप), ता. पेण या ठिकाणी शुक्रवार ०६ मार्च रोजी होत आहे.ङ्ग सदर कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू असून सालाबादप्रमाणे काही तरुण किल्ले रायगडावरून ज्योत आणणार आहेत या समुहामध्ये तरुण युवक-युवती धडाडीने भाग घेत ही पेटती ज्योत दरवर्षी आणतात. या कार्यक्रमामध्ये सकाळी ११ ते ११.३० शिवप्रतिमा पुजन होणार असून याप्रसंगी शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद दादा भोईर, जिल्हा प्रमुख प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, राजिप नवनिर्वाचित सदस्या पल्लवीताई भोईर, शिवसेना माजी संपर्कप्रमुख विष्णूभाई पाटील, जिल्हा समन्वय प्रमुख नरेश गावंड, उपजिल्हा प्रमुख अविनाश म्हात्रे, महिला संघटीका दिपश्री पोटफोडे, उपजिल्हा संघटीका दर्शना जवके, पेण पं.स. सदस्य संजय भोईर, पोलिस निरीक्षक सचिन कुलकर्णी आदी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. शिवजयंती उत्सवाची तयारी शिवसेना शाखा चोळे, शिवनेरी गृप, दिपक पाटील मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ चोळे हे जोरदार तयारी करत असून दिवसभरात शिवजयंती निमित्ताने भरगच्च कार्यक्रमासह विविध क्षेत्रात कामगिरी केलेले मान्यवर, देशासाठी सेवा करत असलेल्या आजी माजी सैनिक, विद्यार्थी व मान्यवर मंडळींचा सन्मान तसेच रात्री ठिक ०९ वाजता श्री समर्थ प्रोडक्शन ऑर्केस्ट्रा स्वरगर्जना -गायक महेंद्र पाटील (जपून चालव होरी) यांचा बहारदार कार्यक्रम होणार असून या संपूर्ण कार्यक्रमासाठी दिपक पाटील, नितिन पाटील, प्रशांत म्हात्रे आदी कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.

